# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना

(जिल्हा नियंत्रणक कक्ष)/(आपत्ती व्यवस्थापन)

दुरध्वनी क्रमांक [02482]-223132 टोल फ्री क्रमांक 1077 फॅक्स क्रमांक (02482)-226477,225326

**E-mail. rdcjalna@gmail.com, jalnaddmo@gmail.com** **Website: - www.jalna.gov.in, http://59.90.142.57/ddmajalna**


जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांक १५/०३/२०२०

**(ई-मेलने/टपालाने)**

आपत्ती प्राधान्य

प्रति,

पोलीस अधिक्षक, जालना

**विषयः-** **नोव्हेल करोना विषाणू (nCoV-19) चा संसर्ग रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेसाठी आवश्यक कार्यवाही करणे बाबत.**

संदर्भः- १) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.

२) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र.२०२०/सा.प्र./को.वि.उ.यो./कावी, दिनांक १२/०३/२०२०.

३) सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडील अधिसुचना करोना२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य५/दिनांक १४/०३/२०२०.

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रांन्वये नोव्हेल करोना विषाणू (nCoV 19) चा संसर्ग रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे बाबत सूचना प्राप्त झालेल्या आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत नोव्हेल करोना विषाणू (nCoV 19) संसर्गबाधित रुग्ण आढळत आहेत.

नोव्हेल करोना विषाणू (nCoV 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा एक भाग म्हणून जिल्हयातील हॅाटेल्स, लॉजींग तसेच घरगुती राहण्याची व्यवस्था या ठिकाणी परदेशी पर्यटक / नागरीक वास्तव्यासाठी असल्यास किंवा आल्यास त्याबाबतचा दैनंदीन अहवाल खालील विहीत नमुन्यात या कार्यालयास सादर करावा.

| अ.क्र. | परदेशी पर्यटकाचे नांव | देश | भारतात दाखल झाल्याचा दिनांक | जिल्हयातील वास्तव्याचे ठिकाण (हॉटेल्स, लॉजींग तसेच घरगुती राहण्याची व्यवस्था इ.चे नांव) | Check in Date and Time | Check Out Date and Time | पुढे गेलेले ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |

तसेच दिनांक ०१/०२/२०२० ते आज रोजी पर्यंत पर्यटनासाठी किंवा अन्य कामासाठी जालना जिल्ह्यातुन भारतात कोठेही अथवा भारताबाहेर गेलेल्या पर्यटकांची माहिती , सद्यःस्थितीत पर्यटनासाठी किंवा अन्य कामासाठी भारतात कोठेही अथवा भारताबाहेर गेलेल्या पर्यटकांची माहिती आणि भविष्यात यापुढे पर्यटनासाठी किंवा अन्य कामासाठी भारतात कोठेही अथवा भारताबाहेर गेलेल्या पर्यटकांची माहिती जसे प्रवाशाचे नांव, पत्ता, संपर्क क्रमांक, प्रवासाचे ठिकाण/देश इ. माहिती जालना जिल्हयातील सर्व टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स एजन्सी कडून आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ तसेच रेल्वे विभाग यांच्या कडून संकलीत करुन या कार्यालयास सादर करावी.

Raut

**(रविंद्र बिनवडे)**

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**

**जालना**

प्रतः

१. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.